# पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -५ कार्यालय, मुंबई

**सागरी पोलीस ठाणे, दुसरा मजला, माहिम रेतीबंदर रोड, माहिम (प), मुंबई.**

**Deputy Commissioner of Police, Zone -5,**

**Sagari Police Station Build., 2nd floor, Mahim Reti Bunder Road,**

**Mahim (W), Mumbai 400016**

**Email ID** – dcpzone5-mum@mahapolice.gov.in


जा.क्र. /पोउआ/परि.०५/वा/२५ दि.०८/०१/२०२५

## प्रेस नोट

विषय :- पोलीस स्थापना दिन सप्ताह याचे अनुषंगाने हस्तगत मुद्देमाल तक्रारदार यांना परत केलेबाबत..

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, परिमंडळ-०५, मुंबई चे अखत्यारीत असलेले दादर, शिवाजी पार्क, माहिम, शाहु नगर, धारावी, कुर्ला, वि.भा.नगर पोलीस ठाणे यांनी विविध गंभीर स्वरुपाचे गुन्हे, मोबाईल चोरी, मोटार वाहन चोरी व इतर दाखल गुन्हे तसेच गहाळ मुद्देमाल याचा CEIR पोर्टल तसेच गोपनीय व तांत्रिक मुद्याचे आधारे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विविध इसमांकडून प्राप्त करून सर्व अधिकारी व अंमलदार यांनी उत्कष्ट कामगिरी करून या गुन्हयातील मालमत्ता हस्तगत केला. सदर हस्तगत करण्यात आलेला एकूण १,७१,७२,७७४/- रुपये किमतीचा मुद्देमाल ज्यामध्ये ३९८ ग्रॅम वजनाचे सोन्या चांदीचे दागदागिने, १६७ मोबाईल फोन , २२ मोटार वाहने व इतर किमती मुद्देमाल याचे पोलीस स्थापना दिन सप्ताह याचे अनुषंगाने दि. ०८/०१/२०२५ रोजी धारावी पोलीस ठाणे अंतर्गत मॉर्निंग स्टार स्कूल हॉल, दुसरा माळा, संत रोहिदास मार्ग, धारावी, मुंबई-१७ या ठिकाणी श्री. गणेश गावडे, पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-५, मुंबई यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सदर कार्यक्रमास एकुण २५० ते ३०० नागरीक उपस्थित होते. उपस्थित असलेल्या गुन्हयातील फिर्यादी तसेच पिडीत व्यक्तींना तसेच मुद्देमालाचे मुळ मालकांना प्रतिष्ठित नागरीक,समाजसेवक,राजकीय पुढारी यांचे उपस्थितीत मुद्देमालाचे हस्तांतरण करण्यात आले.

यावेळी उपस्थित तक्रारदार श्रीमती निधी सिंघानिया यांनी मुंबई पोलीसांचे आभार व्यक्त केले तसेच मुंबई पोलीसांमुळे ते पर राज्यातील असून देखील त्यांना मुंबई सारख्या शहरात सुरक्षित वाटत असल्याचे मनोगत व्यक्त केले. तसेच तक्रारदार श्री सुरेश बाबु लोकरे यांनी मुंबई पोलीसांनी त्यांच्या घरी घडलेल्या घरफोडीचा गुन्हा ०८ दिवसात पोलीसांनी अथक परिश्रम घेवून उघडकीस आणल्याबाबत पोलीसांचे आभार व्यक्त केले आहे. तसेच माहिम पोलीस ठाणे हद्दीतील तक्रारदार अनिवासी भारतीय महिला नामे श्रीमती सिमी कटारिया वय ५७ वर्षे यांनी मुंबई पोलीस दलाची कामगिरी ही स्कॉटलंड यार्ड किंवा अमेरिकन पोलीस यांच्यापेक्षाही प्रभावशाली असल्याचे मनोगत व्यक्त केले.

परिमंडळ-५, मुंबई अंतर्गत सर्व पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस उप आयुक्त श्री. गणेश गावडे, परिमंडळ-५, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संभाजी मुरकुटे कुर्ला विभाग, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. अरुण भोर माहिम विभाग, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रविण तेजाळे दादर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली दादर, शिवाजी पार्क, माहिम, शाहु नगर, धारावी, कुर्ला, वि.भा.नगर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी विविध इसमांकडून सदरचा मुद्देमाल हस्तगत केला व आज रोजी पोलीस स्थापना दिन सप्ताह याचे अनुषंगाने फिर्यादी तसेच पीडित व्यक्तींना तसेच मुद्देमाल मुळ मालकांना परत देण्यात आला असुन त्याबाबत नागरिकांनी समाधान व कृतज्ञा व्यक्त केली आहे.

(गणेश गावडे)
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ ०५, मुंबई